दि. ०८/०६/२०२३

# प्रेसनोट

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील उद्यान विभागाच्या सहायक उद्यान निरीक्षक व उपलेखापाल यांचेवर लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | भोसरी एम.आय.डी.सी. पो. स्टे. पिंपरी चिंचवड गु.र.नं. २४४/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७, ७ अ, १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ४७ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) किरण अर्जुन मांजरे, वय ४६ वर्ष, सहायक उद्यान निरीक्षक, उद्यान विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे.<br>२) संजय देवराम काळभोर, वय ५६ वर्ष, उपलेखापाल, उद्यान विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १७,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १७,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | ०७/०६/२०२३ |
| सापळा दिनांक | ०७/०६/२०२३ |

ठिकाण :- उद्यान विभाग कार्यालय, गुलाब पुष्प उद्यान, नेहरुनगर, भोसरी , पिंपरी चिंचवड.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे कॉन्ट्रक्टर असून त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उद्यानासाठी केलेल्या देखभालीच्या कामाचे बिल मंजूर करणेसाठी लोकसेवक किरण मांजरे यांनी तक्रारदारांकडे १७,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक १) किरण मांजरे यानी तक्रारदार यांचेकडे १७,०००/- रुपयांची (सतरा हजार रुपये) मागणी केली. तसेच लोकसेवक २) संजय काळभोर यानी सुद्धा लाच मागणी करून मांजरे यानी केलेल्या लाच मागणीस सहाय्य केले व लोकसेवक मांजरे यांनी लाच रक्कम स्विकारल्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यामध्ये दोघांना अटक करुन आज दि. ०८/०६/२०२३ रोजी मा. विशेष न्यायालय, पुणे येथे हजर केले असता, मा. न्यायालयाने दि. १०/०६/२०२३ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे,पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.